बौद्ध धर्मांतरित अनुयायांच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ - लातूर जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेंतर्गत समाजशास्त्र विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

या पदवीकरिता सादर केला जाणारा

शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधिका

आशा अर्जुनराव मडके

कबीर नगर, उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक

नारायण तु. कांबळे

प्राध्यापक

पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग

स्वामी विवेकानंद महाविद्यालय,

शिरुर (ताज.) ता.अहमदपूर जि.लातूर

संशोधन केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जानेवारी २०२४

"बौद्ध धर्मांतरीत अनुयायांच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ - लातूर जिल्हा"

प्रस्तावना:

जागतिक दृष्टिकोनातून विसावे शतक हे अतिशय महत्त्वाचे शतक ठरले. याच शतकात १७८९ च्या फ्रेंच आणि १९१७ च्या रशियातील राज्यक्रांतीमुळे त्या देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात आमूलाग्र परिवर्तन झाले. आधुनिक काळातील या दोन क्रांत्या सामाजिक विश्वात महत्त्वपूर्ण मानल्या जातात. या पार्श्वभूमीवर भारतात ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपुरात मानवी अधिकारापासून वंचित असलेल्या पाच लाख आणि १६ ऑक्टोबरला चंद्रपूर येथे तीन लाख दलितांना बौद्ध धर्माची दीक्षा देऊन त्यांची विषम समाजव्यवस्थेच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गुलामीतून मुक्तता केली. ही क्रांतिकारी घटना आहे. ही क्रांती वैचारिक परिवर्तनाच्या आधारावर झाली. कोणत्याही प्रकारचा रक्तपात न होता, ही जगातील एक महान क्रांती म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. ही क्रांती डॉ. आंबेडकरांनी बुद्धाच्या धम्माच्याद्वारे घडवून आणली. या धम्मक्रांतीने भारतीय समाजातील मानवी हक्कापासून वंचित असणाऱ्या दलित समाजात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. या क्रांतीमुळे दलित समाजात घडून आलेल्या परिवर्तनाचा इतर समूह देखील विचार करू लागले. त्यामुळे आजही या धम्मचक्र परिवर्तनाचा परिणाम इतर समाज घटकावर समकालीन समाज व्यवस्थेत पडत असल्याचे आढळून येत आहे.

डॉ. आंबेडकरांना भारतीय समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणायचे होते. येथील विषमताधिष्ठित समाजव्यवस्था नष्ट करून समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते.मूळातच त्यांची समतामूलक समाजाची संकल्पना होती, विशेष म्हणजे त्यांची समतामूलक समाजाची संकल्पना बुद्धाच्या शिकवणुकीवर आधारित होती. त्यांना अपेक्षित असलेली समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून धर्मांतरित बौद्ध समाजाने समकालीन समाज जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणून आपल्या सामाजिक जीवनातील जुन्या प्रथा व परंपरा दूर करून समतामूलक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.म्हणून बौद्ध धम्म ही एक सामाजिक तत्त्वप्रणाली आहे. याचा अर्थ बुद्धाच्या तत्त्वावर अर्थात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यावर आधारित भारतीय समाजाची उभारणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होती.

सामाजिक परिवर्तन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उद्दिष्ट होते. स्वातंत्र्य आणि समतेमधून जन्माला आलेला स्वाभिमान आणि अस्मिता ओळख, हे सामाजिक परिवर्तनाचे उद्दिष्ट त्यांना अभिप्रेत होते. बौद्ध धर्म आणि सामाजिक परिवर्तनाच्या

संदर्भात असे दिसून येते की, सामाजिक परिवर्तनाच्या घटनेचा विचार 'प्रक्रिया' 'विकास' किंवा 'प्रगती' म्हणून करीत नाही. तर ते एक उद्दिष्ट किंवा स्वतःच्या अधिकारासाठी एक ध्येय म्हणून सामाजिक परिवर्तनाचा विचार केला आहे. अशाप्रकारे सामाजिक परिवर्तन हे विचारप्रणालीशी संबंधित आहे.

विषय निवडीमागील भूमिका

'बौद्ध धर्मांतरितांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ: लातूर जिल्हा' हा शोध प्रबंधाचा विषय आहे. धर्मांतरितांच्या सामाजिक जीवनात जे परिवर्तन घडून आलेले आहेत, त्याचा अभ्यास करणे हा मुख्य हेतू आहे. बौद्ध धम्माच्या स्वीकारामुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना एक वैचारिक अधिष्ठान लाभले, त्यामुळे कोणत्या बाबी स्वीकारायच्या आणि कोणत्या नाकारायच्या याबाबत त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आणि बौद्ध धर्माच्या दृष्टिकोनातून येथील प्रस्थापित व्यवस्था मूल्ये, परंपरा आणि साहित्य याबाबत बौद्ध लोक परिशिलन करू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आणि बौद्ध धर्म स्वीकारामुळे बौद्धांना एक जीवनदृष्टी मिळाली. बौद्ध धर्म निरीश्वरवादी आहे. म्हणून बौद्ध धर्मांतरीत अनुयायांनी देव, ईश्वर ही संकल्पना नाकारली. त्यांनी देव, आत्मा, पुनर्जन्म स्वर्ग नरक या सर्व गोष्टी खोट्या आहेत. या धार्मिक गोष्टीच्या माध्यमातून आपले मानसिक, सामाजिक आणि धार्मिक शोषण करण्यात आले. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी अशा प्रकारच्या धार्मिक अंधश्रद्धांना मूठमाती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये दिलेल्या २२ प्रतिज्ञानुसार ते आचरण करू लागले. अशा प्रकारे बौद्ध धम्मांच्या स्विकारानंतर त्यांनी सर्व प्रकारच्या धार्मिक परंपरांचा त्याग केला. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक गतिशीलता निर्माण झाली. त्यांच्या सामाजिक दर्जात परिवर्तन घडून आले. धार्मिक परिवर्तन हा फार पूर्वीपासून समाजशास्त्रीय विचारविश्वातील अभ्यासाचा विषय आहे. वैयक्तिक प्रेरणा, सामाजिक गतिशीलता आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या जटील परस्परसंवादाचे प्रतिबिंब करतो. हा अभ्यास लातूर जिल्ह्यातील बौद्ध धर्मांतरित व्यक्तींच्या सामाजिक, आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो.

वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, बौद्ध धर्माच्या स्वीकाराचा प्रचंड प्रभाव धर्मांतरीतावर पडला आणि त्या प्रभावातून त्यांच्यामध्ये परिवर्तनाची प्रक्रिया घडून आली. धार्मिक, सांस्कृतिक, वैचारिक, मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी विविध क्षेत्रांत त्यांच्यामध्ये परिवर्तन झाले. हे परिवर्तन केवळ बौद्ध धर्माच्या स्वीकारामुळे झाले. या परिवर्तनाचा प्रभाव विशेषतः धर्मांतरित बौद्ध अनुयायांच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिवर्तनावर कोणत्या स्वरूपाचा प्रभाव पडलेला आहे, हा संशोधनाच्या केंद्रस्थानी विचार आहे. प्रस्तुत संशोधनाचा मूळ हेतू बौद्ध

धर्मांतरित अनुयायांच्या सामाजिक, व सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने होणाऱ्या संशोधनाला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी, बौद्ध धर्मांतरित अनुयायांच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या अनुषंगाने यापूर्वी जे अभ्यास झाले आहेत, त्यातील काही उपलब्ध साहित्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

कराडे, जगन (२००६) "धमक्रांतीची फलश्रुती" या संपादित ग्रंथात डॉ. पी. जी. जोगदंड यांनी आपल्या लेखाची मांडणी १९८९ ते ९० मध्ये धर्मांतराच्या संदर्भात जे संशोधन केले होते. महाराष्ट्रभर फिरून त्यांनी प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या होत्या. धर्मांतरामुळे आपल्यात नेमकी कोणते परिवर्तन झाले असा प्रश्न मुलाखत अनुसूचीमध्ये होता. नवबौद्धाच्या मुलाखतीतून आलेल्या प्रतिक्रिया या पुढील प्रकारच्या होत्या. "धर्मांतरामुळे स्वसन्मान मिळाला. जाणीव जागृती झाली. गावकीची कामे व पारंपारिक कामे टाकून देण्याची संधी मिळाली. पुढे पुढे जाण्याची तीव्र भावना निर्माण झाली. अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद निर्माण झाली. न्यूनगंड गळून पडला आणि आपण बंधनातून मुक्त झाले असा विचार जोर धरू लागला. आम्हाला नवीन मूल्य संस्कृती मिळाली. अशा पद्धतीची मांडणी केली आहे.आर.जे. मिलर (१९६७) यांनी "दे विल नॉट डाय हिंदू, द बुद्धिस्ट कन्वर्सेशन ऑफ महार अनटेचेबल, एशियन सर्वे, व्हाल्यूम ७ मध्ये धर्मांतरामुळे पूर्वाश्रमीच्या महारांमध्ये फक्त लग्नविधी, व्यावसायिक धार्मिक रूढी यांच्यातच बदल झाला आहे, असे नाही तर त्यांच्या एकंदरीत परिप्रेक्षांमध्ये आणि स्वतःच्या जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघण्याच्या दृष्टीत फार मोठे परिवर्तन झाले आहे अशी मांडणी केली आहे. तर डॉ. एलीनार झेलियट यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड द अनटेचेबल मुव्हमेंट, ब्ल्यूमून बुक्स, न्यू दिल्ली, (२००४) या ग्रंथात," बौद्ध धम्माचा स्वीकार हा अस्पृश्यांना समतेच्या स्तरावर आणण्यासाठी विशेषाधिकारापेक्षा दुसरा मार्ग शोधण्याचा प्रयत्न होता. हिंदु जातीच्या मनातून महार बौद्धांचा दर्जा बदलत नसला तरी त्यांच्यात सन्मान निर्माण करणे आणि न्यूनगंडाची भावना कमी होणे या दृष्टीने धर्मांतर परिणामकारक राहिले. रविनंद होवाळ यांनी (२००७) "धर्मांतराची पन्नास वर्ष काय कमावले काय गमावले" या ग्रंथात "बौद्ध धम्मामुळे आपण फार उच्च दर्जाचा स्व विश्वास आणि नैतिक बळ मागील पन्नास वर्षात कमावलेले आहे असे मत मांडले आहे. प्रस्तुत प्रबंधात संशोधन विषयाच्या अनुषंगाने असणाऱ्या उपलब्ध साहित्याचा आढावा घेऊन संशोधनाचे एक वेगळेपण दर्शविले जाणार आहे.

समस्या विधान

- लातूर जिल्ह्यातील धर्मांतराच्या घटनेने एक समाजशास्त्रीय प्रश्नचिन्ह उभे केले आहे, जे तपासण्याची गरज आहे. या अभ्यासाचे उद्दिष्ट खालील प्रश्नांचे निराकरण करणे आहे.
- लातूर जिल्ह्यातील व्यक्तींना त्यांच्या निर्णयाचे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परिमाण लक्षात घेऊन बौद्ध धम्म स्वीकारण्यास कार्यप्रवृत करते?
- बौद्ध धर्माचा अवलंब केल्याने धर्मांतरितांच्या सामाजिक, सांस्कृतिक वर्तनावर, आणि दैनंदिन व्यवहारातील बदल यासह कोणत्या प्रकारे परिणाम होतो?
- लातूर जिल्ह्यातील धर्मांतर प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि धर्मांतरितांच्या सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाला समर्थन देण्यासाठी बौद्ध सामाजिक संस्था व बौद्ध अनुयायी कोणती भूमिका बजावतात?

संशोधनाची उद्दिष्टे

बौद्ध धर्मांतरितांच्या वर्तनात झालेल्या परिवर्तनाच्या समस्या समजून घेणे, हा प्रस्तुत संशोधनाचा केंद्रवर्ती विचार आहे. हा केंद्रवर्ती विचार साध्य करण्याच्या अनुषंगाने खालील उद्दिष्टांची मांडणी केली आहे. धर्मांतरित अनुयायांच्या सामाजिक परिवर्तनाची गतिशीलता समजून घेण्याची गरज आहे. समकालीन समाजातील धार्मिक संबंधावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांवरील व्यापक प्रमाणात योगदान देण्याचे या अभ्यासाचे **उद्दिष्ट** आहे.

- लातूर जिल्ह्यातील बौद्ध धर्मातील धर्मांतराच्या प्रेरणांचा व त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमीचा शोध घेणे,
- बौद्ध धर्मांतरित अनुयायांची सामाजिक, आणि सांस्कृतिक परिस्थितीचा शोध घेणे.
- बौद्ध धर्मांतरितांच्या जाणिवा व सामाजिक उत्तरदायित्वाचे विश्लेषण करणे.
- धर्मांतरानंतर बदललेली जीवनशैली, आणि दैनंदिन व्यवहारातील बदल जाणून घेणे.
- धर्मांतराची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी सामाजिक संस्थांच्या भूमिकांचा अभ्यास करणे.
- बौद्ध धर्मांतरित अनुयायांकडून होणारे आचरण आणि त्यांच्या अपेक्षांचा अभ्यास करणे.

गृहितके

- बौद्ध धम्म स्वीकारण्याची प्रेरणा सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांच्या संयोजनाने प्रभावित आहे.

- बौद्ध धर्मांतरितांना वेगवेगळ्या प्रमाणात सामाजिक एकात्मतेचा अनुभव येतो. ज्यात समुदायाचे स्वीकृतीकरण, सामाजिक व्यवहार महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.
- बौद्ध धर्मांतरितांच्या सामाजिक, व सांस्कृतिक व्यवहार धर्मांतरानंतर वैविध्यपूर्ण बदल झाले आहेत.
- धर्मांतराची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी बौद्ध सामाजिक संस्थाची भूमिका आणि धर्मांतरितांच्या सामाजिक, आणि सांस्कृतिक परिवर्तनाला समर्थन देण्यात महत्वपूर्ण आहे.

संशोधनाचे विश्व

संशोधनाच्या सोयीसाठी महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा असलेल्या लातूर जिल्ह्यातील बौद्ध धर्मांतरितांच्या सामाजिक, आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या अनुषंगाने हे संशोधन आहे. हे कार्यक्षेत्र संशोधनाच्या दृष्टीने लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. या जिल्ह्यात उदगीर, जळकोट, देवणी, निलंगा, शिरूर अनंतपाळ, औसा, लातूर, रेणापुर, चाकूर, अहमदपूर या दहा तालुक्याचा समावेश होतो.

सैद्धांतिक दृष्टिकोन

प्रस्तुत संशोधन हे संरचनात्मक कार्यात्मक सैद्धांतिक दृष्टिकोनाशी संबंधित आहे.हे संशोधन परिवर्तनाच्या चलाचा अवलंब करते. समाजशास्त्रात सामाजिक परिवर्तन ही संज्ञा निश्चित अर्थाने वापरली जाते. समाजात घडून येणाऱ्या सर्व बदलांचा त्यात समावेश होत नाही. समाजाच्या संरचनेतील परिवर्तन म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. जीवनाच्या स्वीकृत पद्धतीमधील बदलाला सामाजिक परिवर्तन असे म्हणता येईल, हे परिवर्तन सांस्कृतिक, सामाजिक रचना, विचारप्रणाली या बदलामुळे झालेली असेल किंवा सांस्कृतिक प्रसारणामुळे किंवा समूहातंर्गत नवीन शोधामुळे झालेले असेल. सामाजिक परिवर्तनाला कोणता एकच घटक कारणीभूत नाही, हे आता सर्वमान्य आहे. तरीही या घटक सिद्धांताने सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने विविध घटकाचे महत्त्व सिद्ध केलेले आहे. म्हणजे सामाजिक परिवर्तन कोणत्याही एका विशिष्ट घटकांमुळेच घडून येत नसून त्याला अनेक घटक जबाबदार असतात.

सांस्कृतिक परिवर्तन ही सामाजिक परिवर्तनापेक्षा जास्त व्यापक अशी संज्ञा आहे. या परिवर्तनामध्ये समाजाच्या कोणत्याही अंगातील परिवर्तनाचा समावेश होऊ शकतो. जसे की धर्मांतर यासारख्या घटना समाजाच्या संस्कृतीच्या अंगात बदल घडवून आणण्यासाठी सहाय्यभूत ठरणारे असतात. म्हणून सांस्कृतिक परिवर्तन ही संज्ञा वापरता येईल. सामाजिक परिवर्तन मात्र समाजाच्या फक्त सरचनेमधील बदल होय. सामाजिक परिवर्तन हा सांस्कृतिक परिवर्तनाचा एक भाग होय. अशा प्रकारे विविध घटकामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

समाज व्यवस्थेत सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या म्हणजे भूमिकाधारकांच्या प्रेरणांवर व मनोवृत्तीवर देखील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप अवलंबून असते. संशोधन प्रवृत्ती व संपादन प्रवृत्ती असणाऱ्या सभासदांची संख्या समाजात जास्त असल्यास काहीतरी नवीन करून दाखवण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण होते. त्यांना वाव मिळतो व त्यातून सामाजिक परिवर्तन घडून येते. या दृष्टिकोनाप्रमाणे संरचनात्मक परिवर्तन हेच खरे सामाजिक परिवर्तन होय. समाजव्यवस्थेच्या विविध घटकांमध्ये एक प्रकारचे संतुलन असते व ते संतुलन टिकविण्याचा समाजव्यवस्थेचा प्रयत्न असतो. तसेच समाजव्यवस्था विशिष्ट प्रकारच्या भौतिक व सामाजिक, सांस्कृतिक वातावरणात कार्य करते. काही वेळा संरचनेच्या अंतर्गतच परिवर्तनाला चालना देणाऱ्या प्रक्रिया कार्यान्वित होतात त्यामुळे संरचना बदलते. अशाप्रकारे संरचनेमध्ये बदल घडवून येतो, अशी सैद्धांतिक मांडणी संरचनात्मक कार्यात्मक परिवर्तनवादी दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने केली जाणार आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे लक्षात घेऊन तथ्य संकलित करण्याच्या दृष्टीने प्राथमिक व दुय्यम अशा दोन्हीही स्त्रोतांचा व साधनांचा वापर केला जाईल. वरील उद्दिष्टांच्या अनुषंगाने संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती व तथ्य संकलनासाठी अर्थातच संशोधकाचा भर प्रामुख्याने या विषयावरील उपलब्ध व अगोदरच प्रकाशित असलेल्या साहित्यावर असेल त्यात विशेषत: धर्मांतरासंबंधी प्रकाशित झालेले साहित्य, शासनाने प्रकाशित केलेले विविध अहवाल, वृत्तपत्रे, पाक्षिके, मासिकांचा आधार घेतला जाईल. प्रस्तुत संशोधन विषयावरील संशोधन कार्यासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला जाईल. विशेष करून ही पद्धत वर्णनात्मक स्वरूपाची असेल.

वरील उद्दिष्टांच्या अनुषंगाने संबंधित माहिती मिळविण्याच्या संदर्भात प्रामुख्याने धर्मांतर, धर्मांतरितांच्या संदर्भात विविध संस्था व धर्मांतरित लोकांकडून, प्रसंगी चर्चेच्या माध्यमातून प्राथमिक माहिती मिळवली जाईल. या व्यतिरिक्त अभ्यासासाठी पूरक अशी माहिती ज्या ज्या स्त्रोतांतून मिळेल त्याचाही संशोधनासाठी आधार घेतला जाईल. संबंधित विषयाची मांडणी ही समाजशास्त्रीय आकलन होण्याच्या दृष्टीने समाजशास्त्रीय ग्रंथाचाही आधार घेतला जाईल.

वय, लिंग, सामाजिक, धार्मिक स्थिती आणि शैक्षणिक पार्श्वभूमी यासारख्या विविध लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा समावेश सुनिश्चित करून, लातूर जिल्ह्यातील बौद्ध धर्मांतरितांच्या वैविध्यपूर्ण आणि प्रातिनिधिक नमुना निवडण्यासाठी उद्देशपूर्ण नमुना तंत्राचा वापर केला जाईल. बौद्ध धर्मांतरितांच्या प्रेरणा, अनुभव, आणि आव्हाने यावर व्यापक तथ्ये संकलित करण्यासाठी मुलाखती, सर्वेक्षण, सहभागी निरीक्षण आणि दस्तऐवज विश्लेषणासह गुणात्मक आणि परिमाणात्मक संशोधन पद्धतीचा वापर

करता येईल. लातूर जिल्ह्यातील बौद्ध धर्मांतरितांच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वर्तनाबद्दल आंतरदृष्टी प्रदान करणारी नमुने, विचार आणि सहसंबंध मिळवण्यासाठी गुणात्मक तथ्ये आणि संख्यात्मक तथ्यांचा सांख्यिकीय साधनासाठी विचार विश्लेषणाचा वापर करता येईल.

संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनाचा विषय बौद्ध धर्मांतरित अनुयायांच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास हा आहे. यासाठी तथ्याचे विश्लेषण व निर्वचन वस्तुनिष्ठपणे करता यावेत तसेच निष्कर्ष प्राप्त करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा व निदानात्मक संशोधन आराखडा याचा संयुक्तपणे उपयोग केला जाणार आहे.

नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवडीतील सहेतुक नमुना निवड प्रकाराचा उपयोग केला जाणार आहे. यामध्ये संशोधक आपल्या अभ्यास विषयाच्या उद्देशांना समोर ठेवून जाणीवपूर्वक समग्रातील एककांची निवड करतो. लातूर जिल्ह्यातील धर्मांतरित अनुयायांच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या घटनांची निवड करण्यासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीचा उपयोग अपेक्षित आहे. लातूर जिल्ह्यातील २०० उत्तरदात्यांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवड केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना समान न्याय देण्याच्या दृष्टीने त्या त्या तालुक्यातील संख्येच्या गुणोत्तरात बौद्ध धर्मांतरित अनुयायांची निवड केली जाईल. त्यासाठी गुणोत्तराचा वापर करण्यात येईल.

$$\frac{\text{तालुक्यातील एकूण अनुयांयी}}{\text{जिल्ह्यातील एकूण बौद्ध धर्मांतरित अनुयांयी}}$$

अशा प्रकारचे सूत्र वापरून धर्मांतरितांच्या परिवर्तनाचे गुणात्मक विश्लेषण करणे शक्य होईल.

तथ्य संकलन व विश्लेषण

तथ्य संकलन हा संशोधन कार्याचा आत्मा आहे. याचा विचार करून संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात विविध पद्धती व साधनांचा वापर करून उपयोगी व वस्तुनिष्ठ तथ्य संकलित केले जाईल. या तथ्य संकलनाच्या प्राथमिक व दुय्यम या दोन्ही स्त्रोतातील पद्धतीचा वापर करण्यात येईल. तथ्य संकलनासाठी मुलाखत, अनुसूची व प्रत्यक्ष निरीक्षण पद्धतीचा अवलंब करून संकलित केलेल्या तथ्यांचा सुव्यवस्थित व वस्तुनिष्ठपणे विश्लेषण व निर्वचन केले जाईल. प्राप्त तथ्यांच्या आधारे संशोधनासाठी निश्चित केलेली गृहीतकृत्ये व्यवस्थितपणे सिद्ध केली जातील.

संशोधन विषयाचे महत्त्व

धर्मांतरितांच्या सामाजिक धार्मिक आणि सांस्कृतिक वर्तनाचा अभ्यास करताना, धर्मांतरित लोकांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते. वा त्यांच्या सामाजिक वर्तनात कोणत्या प्रकारचे बदल झालेले आहेत, वा होणे अभिप्रेत आहे. याचा शोध घेण्यासाठी या पार्श्वभूमीवर अभ्यास होणे गरजेचे आहे.

हे संशोधन अनेक पातळ्यावर महत्त्वाचे आहे. शैक्षणिकदृष्ट्या, हे धार्मिक परिवर्तनावरील समाजशास्त्रीय साहित्यात योगदान देते. ओळख निर्मिती आणि सांस्कृतिक परिवर्तन यातील गुंतागुंतीची आंतरदृष्टी देते. व्यावहारीकदृष्ट्या, निष्कर्ष लातूर जिल्ह्यातील विविध धार्मिक समुदायांमध्ये सामाजिक एकसंघता आणि समजूतदारपणा वाढवण्याच्या उद्देशाने धोरणे आणि उपक्रमाची माहिती देऊ शकतात. शिवाय, बौद्ध धर्मांतरितांच्या अनुभवांवर प्रकाश टाकून, अभ्यास धार्मिक सीमा ओलांडून, व्यापक समुदायांमध्ये सहानुभूती आणि सुसंवाद वाढविण्यात योगदान देऊ शकतो. हा अभ्यास तसा दुर्लक्षित होता, याबाबत काही अभ्यास झालेले असले तरी ते विशिष्ट जिल्हा व राज्याच्या मर्यादित आहेत. विशेषतः लातूर जिल्ह्याच्या संदर्भात असा अभ्यास केला गेलेला नाही. त्यामुळे हा अभ्यास इतर संशोधकासाठी दिशादर्शक ठरणार आहे.म्हणून या संशोधनाचे वेगळेपण दिसून येते. नव्हेतर यावरून याचे महत्त्व अधोरेखित होते. संशोधकाने बौद्ध धर्मांतरितांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ लातूर जिल्हा, या विषयाची निवड करताना प्रामुख्याने प्रस्तुत अभ्यासात विविध बौद्ध धर्मांतरितांच्या वैविध्यपूर्ण वर्तनाच्या अनुषंगाने मांडणी करण्याचा संशोधकाचा प्रयत्न राहिलेला आहे. अर्थात प्रस्तुत संशोधन प्रामुख्याने सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा धर्मांतरितांच्या दृष्टिकोनातून त्यांच्या वर्तनाचा सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. याबाबत सापेक्षता अतिशय अल्प संशोधन झालेले असे हे क्षेत्र आहे. या संशोधनाद्वारे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आकलन व्हावे, हा संशोधकाचा प्रामाणिक हेतू आहे. या अभ्यासाचे महत्त्व सांगण्यास इतकेसे पुरेसे आहे.त्यामुळे वरील पार्श्वभूमीवरून प्रस्तुत संशोधनाचे एक वेगळे महत्त्व आहे.

संशोधनाच्या मर्यादा

हे संशोधन भौगोलिक दृष्ट्या लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यापुरताच मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधनाचा प्रयत्न तसा अमर्याद व निर्णायक अशा स्वरूपाचा कदापी नाही. अशा प्रकारच्या संशोधन प्रबंधात तो सम्यक अर्थाने (संपूर्ण पैलूंचा विचार करून) होणेही शक्य नाही.तर बौद्ध धर्मांतरितांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा सहसंबंध कोणत्या स्वरूपाचा राहिलेला आहे, त्यामध्ये कोणते सामाजिक परिवर्तन घडून आले आहे, यापुरतेच हे संशोधन मर्यादित आहे. अतिशय स्पष्ट शब्दात सांगावयाचे झाल्यास विचारात घेतलेले क्षेत्र अतिशय मर्यादित अशा स्वरूपाचे

आहे.विशेषत:हा अभ्यास लातूर जिल्हयापुरताच मर्यादित आहे, आणि इतर प्रदेशांसाठी निष्कर्षाचे सामान्यीकरण मर्यादित असू शकते. उद्देशपूर्ण नमुना असूनही, लातूर जिल्ह्यातील बौद्ध धर्मांतरितांच्या लोकसंख्येतील संपूर्ण विविधता या अभ्यासात पकडता येणार नाही. सहभागीच्या प्रतिसादांवर सामाजिक इष्टतेच्या पूर्वाग्रहाने प्रभाव टाकला जाऊ शकतो, संभाव्यता स्वयंअहवाल केलेल्या माहितीच्या अचूकतेवर परिणाम होतो. या अभ्यासात बौद्ध धर्मांतरितांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनात कालांतराने बदल होऊ शकत नाहीत आणि परिणाम तथ्य संकलनाच्या कालावधीसाठी संदर्भ विशिष्ट असू शकतात. म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाच्या या मर्यादा आहेत.

साहित्य संदर्भ पद्धत

संशोधनास संदर्भ देण्यासाठी पुढील पद्धतीचा वापर करण्यात येईल. प्रस्तुत संशोधन प्रबंधात समाजशास्त्रात जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या ASA (American Sociological Association) च्या चौथ्या आवृत्तीच्या (आडनाव, नाव आणि वर्ष) या मार्गदर्शक सूचनांचा वापर करण्यात येईल.

प्रकरणांची मांडणी

संकलित तथ्यांचे वर्णन, विश्लेषण व अन्वयार्थ स्पष्टतेसाठी खालील सहा प्रकरणांमध्ये संशोधन प्रबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे ती पुढील प्रमाणे.

अनुक्रमणिका

१) प्रस्तावना
२) संशोधन पद्धती आणि पूर्व संशोधन
३) बौद्ध धर्मांतरित अनुयायांची वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमी
४) बौद्ध धर्मांतरित अनुयायांमधील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन.
५) बौद्ध धर्मांतरित अनुयायांचे धार्मिक आचरण : वास्तव आणि अपेक्षा
६) सारांश व निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ

१) बोबडे, प्रकाश. १९८४. भारतीय समाजरचना. नागपूर: मंगेश प्रकाशन.
२) गजघाटे, दा. स. १९९२. बुद्ध भीमाची धम्मक्रांती. नागपूर: ऋचा प्रकाशन.
३) गारे, गोविंद. लिमये, शिरुभाऊ. १९७३. महाराष्ट्रातील दलित: शोध आणि बोध. मुंबई: सहाध्ययन प्रकाशन.
४) होवाळ, रवीनंद नामदेव. २००७. धर्मांतराची पन्नास वर्ष: काय कमावले, काय गमावले. कोल्हापूर: नमोत्क्रांती प्रकाशन.
५) जोगदंड, पी.जी. २००६. दलित चळवळ: सिद्धांत आणि व्यवहार. मुंबई: प्रतिशब्द प्रकाशन.
६) कांबळे, अरुण. २००६. धर्मांतराची भीमगर्जना. पुणे: सुगावा प्रकाशन.

७) करांडे, जगन्नाथ. (संपादित) २००६. धम्मक्रांतीची फलश्रुती. पुणे: तक्षशिला प्रकाशन.
८) खरात, शंकरराव. २००६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर. पुणे: इंद्रायणी साहित्य प्रकाशन.
९) मेश्राम, केशव. २००७. धर्मांतराचे अर्धशतक. मुंबई: लोकवाङ्मय गृह
१०) मोरे, मा. श. २०००. महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास. औरंगाबाद: कौशल्य प्रकाशन.
११) मून, वसंत. १९९९. डॉ.आंबेडकरांचा धम्म प्रवास. मुंबई : मनोविकास प्रकाशन.
१२) आगलावे, प्रदीप.२००१. सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे. नागपूर: साईनाथ प्रकाशन.
१३) एलीनार, झेलियट. २००४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड द अनटचेबल मोमेंट न्यू दिल्ली: ब्ल्यूमून बुक्स

संशोधिका
आशा अर्जुनराव मडके
कबीर नगर, उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक
नारायण तु. कांबळे
प्राध्यापक
पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरुर (ताज.) ता.अहमदपूर जि.लातूर